ISSN 0976-0377
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

Editor In Chief
Dr. Balaji Kamble

RNI. MAHMUL02805/2010/33461

IMPACT FACTOR 5.35

ISSN 0976-0377

UGC Approved International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

UGC APPROVED REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue : XVIII, Vol. II**
**Year -IX (Half Yearly)**
**(July 2018 To Dec. 2018)**

**Editorial Office :**
'Gyandeep',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 - 241913
09423346913,09637935252,
09503814000,07276301000

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com
drkamblebg@rediffmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication,
Latur, Dist. Latur.-415331
(M.S.) India

**Price: ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Latur, Dist. Latur (M.S.)
Mob. 09423346913, 9503814000

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Aloka Parasher Sen**
Professor, Dept. of History & Classics,
University of Alberta, Edmonton,
(CANADA).

**Dr. Huen Yen**
Dept. of Inter Cultural
International Relation
Central South University,
Changsha City, (CHAINA)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur. (M.S.)

**Dr. G.V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Laxman Satya**
Professor, Dept. of History,
Lokhevan University, Loheavan,
PENSULVIYA (USA)

**Bhujang R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Malakpet, Hyderabad. (A.P.)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi , Dist. Latur. (M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITORS**

**Dr. S.D. Sindkhedkar**
Vice Principal
PSGVP's Mandals College,
Shahada, Dist. Nandurbar (M.S.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics
Maharashtra Mahavidhyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Veera Prasad**
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, (A.P.)

**Johrabhai B. Patel,**
Dept. of Hindi,
S.P. Patel College,
Simaliya (Gujrat)

**CO-EDITORS**

**Sandipan K. Gaike**
Dept. of Sociology,
Vasant College,
Kej, Dist. Beed (M.S.)

**Ambuja N. Malkhedkar**
Dept. of Hindi
Gulbarga, Dist. Gulbarga,
(Karnataka State)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani,Dist. Parbhani.(M.S.)

**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
B.K. Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 5.35
ISSN 0976-0377
Issue:XVIII, Vol. II, July 2018 To Dec. 2018

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Studies on Physico-chemical Parameters of Aloor Tank, Osmanabad<br>**Gopal Kulkarni** | 1 |
| 2 | Growth of Sugar Industry in India<br>**Dr. B. M. Biradar** | 7 |
| 3 | लातूर जिल्हयातील सहकारी चळवळीच्या प्रगतीचा आढावा<br>**डॉ.बालाजी ग्यानोबा कांबळे** | 15 |
| 4 | व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रणेता बर्ट्रॉण्ड रसेल यांची शिक्षणविषयक वास्तवादी विचारसरणी<br>**डॉ.एन.एच.कुलकर्णी** | 21 |
| 5 | शिक्षणशास्त्र महाविद्यालयामधील प्रशिक्षणार्थ्यांचे सराव अध्यापनातील व्यवस्थापन कौशल्य : एक अभ्यास<br>**डॉ. मधूकर पुंडगे** | 26 |
| 6 | उपेक्षीताचा पूर्व इतिहास आणि आधुनिक युगातील उपेक्षीत व संरक्षणाबाबत उपाय<br>**डॉ. एम.एस. कांबळे** | 31 |
| 7 | असहकार चळवळीमध्ये पश्चिम विदर्भातील महिलांचे योगदान : एक चिकित्सक अध्ययन<br>**डॉ. अमोल बोरकर** | 37 |
| 8 | भारतीय सामाजिक, धार्मिक चळवळी आणि प्रार्थना समाज<br>**डॉ.दादाराव दत्तराव पानपट्टे** | 41 |
| 9 | भटक्या स्त्रीची व्यथा मांडणारी 'तीन दगडाची चूल'<br>**डॉ. अंकुशकुमार चव्हाण** | 46 |
| 10 | न देवचरितं चरेत् ।<br>**डॉ. प्रशांत बी. बिरादार** | 55 |

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 5.35
ISSN 0976-0377
Issue : XVIII, Vol. II, July 2018 To Dec. 2018


# भटक्या स्त्रीची व्यथा मांडणारी 'तीन दगडाची चूल'

डॉ. अंकुशकुमार चव्हाण

9 Research Paper - Marathi

मराठी साहित्यातील आत्मकथन हा वाङ्मय प्रकार अनेक स्त्री लेखिकांनी आपल्या जीवन अनुभवाने समृद्ध केला आहे. पुरुषांची काही आत्मकथने प्रकाशझोतात आल्यानंतर स्थिर जीवन जगणाऱ्या बऱ्याच दलित लेखिका आत्मकथन लिहिण्यास प्रवृत्त झाल्या. त्या मानाने भटक्या-विमुक्त स्त्रीने आपल्या व्यथा वेदनांची जीवघेणी कहाणी थोड्या उशिराने सांगितली. याचे कारणही येथील सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थितीत शोधावे लागते. अज्ञानाच्या, दारिद्र्याच्या, अंधश्रद्धेच्या आणि खुळचट कल्पनांच्या खाईत बुडालेल्या भटक्या-विमुक्त जाती-जमातीतील एखाद्या तरुणाने आत्मकथनाच्या माध्यमातून समूह जीवनाच्या वेदना शब्दबध्द करणे जेथे गुन्हा ठरतो तेथे एखाद्या स्त्रीने जीवनाचे चांगुलपण जपण्यासाठी जमातीतील अनिष्ठ रूढी प्रथांचे, स्त्री दास्याचे आणि स्त्रीमनांच्या वेदनांचे उघडेनागडे दर्शन घडविण्यासाठी आत्मकथन लिहिणे निश्चितच कौतुकास पात्र ठरते. जमातीला, जमातीच्या परंपरेला, जमातीतील जात पंचायतीच्या शिक्षेला न जुमानता विमल दादासाहेब मोरे यांनी भटक्या-विमुक्त स्त्रीच्या पाचवीला पूजलेली दुःख वेदनांची 'तीन दगडाची चूल' लिहिली . या आत्मकथनाने मराठी दलित आत्मकथन वाङ्मयाच्या परंपरेत मौलिक भर टाकली. परंपरेच्या, अज्ञानाच्या, अंधश्रद्धेच्या गर्तेत अडकलेल्या आणि रूढी-प्रथेच्या चक्रात गुरफटलेल्या भटक्या-विमुक्त जमातींपैकी गोंधळी जमातीत जन्मलेल्या मुलीच्या अवहेलनेपासून ते तिला आत्मभान येईपर्यंतचा प्रवास या आत्मकथनात आला आहे. कुबट वासाच्या, घाणेरड्या फाटक्या-तुटक्या; झोपडीत वाढलेल्या विमल मोरेंचे आत्मकथन म्हणजे भटक्या जमातीतील स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या नरकप्राय

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 5.35
ISSN 0976-0377
Issue : XVIII, Vol. II, July 2018 To Dec. 2018


यातनाच होत. या आत्मकथनातून 'गोंधळी' आणि 'कुडमुडे जोशी' या जमातीतील स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या अपार दु:ख, दैन्य, दास्याचे जिवंत चित्रण लेखिकेने रेखाटले आहे.

गावोगाव भटकंती करणारी, पालं ठोकून राहणारी, सदैव प्रस्थापित समाजाच्या आणि पोलिसांच्या अत्याचाराला तोंड द्यावे लागणारी इतर भटक्या-विमुक्त जमातींसारखीच गोंधळी ही एक जमात आहे. या जमातीला भोगावे लागणारे दु:ख आणि या जमातीतील स्त्री म्हणून भोगाव्या लागणाऱ्या यातना अशी दु:खाची दुहेरी वीण या आत्मकथनातूने पाहावयास मिळते. विमल मोरेंचा 'इमीचा' मोठा भाऊ अशोक दादा तिला शाळेत घालतो. तेव्हापासून ते 'इमी' स्वतंत्र जीवन जगू लागते, स्त्री-मुक्तीवर व्याख्याने देऊ लागते इतपर्यंतचा प्रवास या आत्मकथनाने व्यापलेला आहे. शिक्षण घेताना मनाची झालेली घालमेल, घरची दयनीय परिस्थिती, घरातील भावा-भावाची भांडणे, वडिलांचे दुखणे, डोक्यावर भांड्याची टोपली घेऊन पोट भरण्यासाठी स्त्रीला करावी लागणारी भटकंती आणि अशातही सुमितीने जपलेले माणूसपण या सर्वांबद्दलचे लेखिकेने पोटतिडकीने केलेले चित्रण मनाला पीळ घालणारे आहे. दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा यांनी वेढलेल्या कुटुंबात इमी नावाची मुलगी लहानाची मोठी होते. कुपोषण, अस्वच्छता, घरातील पुरुष व्यक्तींचा व्यसनीपणा, अन्याय, अत्याचार हे सर्वच तिला सहन करावे लागते. गरिबीमुळे, भटकंतीमुळे शाळेत मन लागत नाही. घरी-दारी अपमान आणि अवहेलना सहन कराव्या लागतात. अन्यायाशी नेहमी गाठ पडत जाते. असे करपून गेलेले बालपण वाट्याला आलेली ही मुलगी जेव्हा धीटपणाने, आत्मविश्वासाने आपली आत्मकहाणी लिहिते तेव्हा सारस्वताची अक्षरेही हलायला लागतात.या आत्मकथनात कमालीचे सत्यदर्शन आहे, वेदना आहेत तसेच कामाला आलेल्या, जीवनाला दिशा देणाऱ्या माणसांची मुक्तकंठाने स्तुती केलेली आहे. पालावरचे जिणे किती कष्टप्रत, अवमानकारक असते याचे जिवंत चित्रण या आत्मकथनातून वाचायला मिळते. स्वत:ला भुकेसाठी चतकोर भाकर असली तरी ती जमातीतील इतरांना देण्याची माणुसकी येथे सापडते. शिक्षणाचा प्रवास आणि लहानपणी जमता-जमता राहिलेले लग्न या दोन्ही घटना तशा परस्परविरोधी. परंतु लेखिकेने त्या अशा वर्णन केल्या आहेत की, या घटनांचा जवळून संबंध वाटायला लागतो. अशोक दादा, सुमिती वहिणी यामुळे लेखिकेला पुष्कळ आधार मिळाला. अगदी लहान वयात लग्न व्हायचे टळले. शाळेत जायला मिळाले. म्हणून अंधारलेल्या जीवनात लेखिकेला प्रकाश किरण पाहायला मिळाले. गोंधळी जमातीतील लोकांची विचित्र मानसिकता लेखिकेने पानापानातून नोंदविली आहे. कधी प्रेमळ, कधी निष्ठूर, माणुसकी सोडून वागणारी माणसे पाहून ती स्तंभितही झाली आहे. दादासाहेब मोरे या परिवर्तनाच्या चळवळीने झपाटलेल्या तरुणाशी तिचा विवाह होतो आणि तिचे एकूणच जीवन पालटून जाते. गरिबी मात्र

सावलीसारखी आयुष्यभर चिकटू न राहते. गरिबीतही लेखिकेच्या बुद्धीला , विचाराला नवी जाग येते. अशातच आत्मभान प्राप्त झाल्यानंतर आत्मकथनाचा शेवट होतो. 'तीन दगडाची चूल' या आत्मकथनाच्या माध्यमातून विमल मोरे यांनी भटक्या-विमुक्तांच्या स्त्रियांना आपले जीवन कोणत्या पातळीवरून व्यथित करावे लागते. या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांची ससेहोलपटच होते. ती ससेहोलपट भटक्या-विमुक्तांच्या स्त्रीया निमूटपणे सहन करीत होत्या. त्यांच्या जीवनामध्ये प्रकाश निर्माण करण्यासाठी आपला खारीचा तरी वाटा असावा म्हणून धडपडणारी लेखिका भटक्या-विमुक्तांच्या स्त्रियांचे प्रतिनिधित्व करते. हे प्रतिनिधित्व करण्यासाठी प्रेरणास्थान आहेत ते पती दादासाहेब मोरे. सर्व हयात दादासाहेबांनी भटक्या-विमुक्तांच्या कार्यासाठी घालविली. असे सुविद्य पती भेटले म्हणूनच मी हे सर्व करू शकले असे प्रांजळ मत विमल मोरे व्यक्त करतात. विमल मोरे यांचा जन्म गोंधळी जमातीत झालेला असल्यामुळे शिक्षण क्षेत्र त्यांच्या जमातीमध्ये बसणारे नव्हते. पण मोठा भाऊ शिकलेला असल्यामुळे विमलला शाळा शिकण्याचा योग आला. तरी पण मुलगी म्हणून आई-वडील शिक्षण देण्यासाठी तयार नव्हते. मोठ्या भावाच्या आग्रहास्तव विमल शिक्षण घेऊ शकली व आपले स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडवू शकली. प्राथमिक शिक्षण घेत असताना लेखिकेच्या जीवनाची होरपळ झ ाली. ती होरपळ अगदी हळूवारपणे आत्मकथनाच्या माध्यमातून अवतरलेली दिसते. लेखिकेच्या घरची एकूण आर्थिकस्थिती ही तशी बेताचीच पण शिक्षण घेण्याची धडपड मात्र कायम होती. शिक्षणाविषयी गोडी लावण्याचे काम मोठ्या वहिनींनी केले. असे बहुविध अनुभव सोबत घेऊन लेखिका आपल्या जीवनाला आकार देत होती. आई वडील पूर्णतः निरक्षर होते व गावोगावी भीक मागत भटकत फिरायचे. कालांतराने वडील आजारामध्ये उपचार वेळेवर न झाल्यामुळे दगावले व लेखिकेच्या जीवनाला एक वेगळे वळण प्राप्त होत गेले. वडील वारल्यानंतर आठवडाभरानंतर 'गबाळ' कार दादासाहेब मोरे यांच्याशी लेखिकेचा विवाह निश्चित झाला. या स्थळाविषयी सर्व कुटुंब परिवार आनंदी होता. विवाह अगदी साध्या पद्धतीने पार पडला. विवाहानंतर दादासाहेबांच्या जीवनातील दाहक वास्तव समजू शकले. आपले जीवन सर्वस्व चळवळीला वाहून देणारा एक झंझावात म्हणून लेखिकेची नजर दादासाहेबांवर खिळली. विवाहाच्या नंतर अनेक घडामोडी घडल्या. जीवनामध्ये वादळ येण्याची शक्यता निर्माण झाली, पण दादासाहेबांसारख्या दृढ; परिवर्तनवादी झंझावातापुढे वादळमात्र विरून गेले. पुढे संसारामध्ये व शिक्षण घेण्यामध्ये दादासाहेब रममान झाले होते. लेखिका मनामध्ये आनंदित होत्या. दादासाहेबांचे एम.ए. ही पूर्ण झाले होते. पण निकाल लागला नसल्यामुळे नोकरीचा प्रश्न अजून उभा होताच. जीवनामध्ये असंख्य अडचणी येत होत्या पण त्याला सामर्थ्याने तोंड देत लेखिका व दादासाहेब जीवनक्रमण करत होते. असे हे आगळे-वेगळे आत्मकथन भटक्या-

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 5.35 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XVIII, Vol. II, July 2018 To Dec. 2018 

विमुक्तांच्या जीवनावर व विशेषत: स्त्री-जीवनावर प्रकाश टाकते.

गोंधळी जमातीमध्ये शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन संकुचित स्वरूपाचा आहे. त्यातही मुलीने शिक्षण घेणे म्हणजे जात बाटवणे असा समज असलेल्या या जमातीतील मुलगी शिक्षण घेते. मोठ्या भावाच्या आग्रहास्तव ती शाळेची पायरी चढते. भाऊ लेखिकेला शाळेत घालतात. तेव्हा लेखिकेची आई तिला घ्यायला येते. सर्व कपडे घेऊन तयारी करण्यास सांगते. माय लेकाच्या या संवादावरून शाळेचे नाव काढताच लेखिकेच्या वडिलांचे डोके भणकते. वडिलांच्या शिक्षणविषयक दृष्टिकोनाचे चित्रण करताना लेखिका म्हणते -''बाबा रागातच दादाला म्हणाले ''आशा, तुजं डोस्क-बिस्क फिरलं का काय ? पुरीला साळंत घालतु म्हणतुस....आमच्या जातीत पुरी साळंत जात्यात का? लय शिकलास म्हंजी शेना झालास व्हय'' भटक्या विमुक्तांच्या एकूणच आत्मकथनातील पुरुषांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन असाच दिसतो. अंधश्रद्धेने ग्रासलेली ही माणसे आपल्या संसाराचा गाडा सोबत घेऊन शेकडों मैल भटकंती करतात. तीन दगडाची चूल मांडून आपल्या पोटाची खळगी भरतात. स्त्रीकडे स्त्रीचा पाहण्याचा दृष्टिकोनही पुरुषांपेक्षा वेगळा नाही. लेखिका एक-दोन दिवस शाळेत जाते तोच तिची आई तिला घ्यायला येते. याविषयी लेखिका म्हणते - ''आई बारा-तेरा दिवसांतच कशी परत आली म्हणून वहिनी चकित झाली होती. मला मात्र फार आनंद झाला. आईच्या हातात पिशवी होती. वहिनीनं आईच्या हातातली पिशवी घेतली. माझं सगळं लक्ष पिशवीकडं होतं .... ''आई बाहेरून आली की, नेहमी पायावर पाणी टाकून घ्यायची. भूतं माणसाबरुबर येत्याती आनिक पाणी टाकलं की म्हाघारी जात्याती'' असं ती नेहमी आम्हाला सांगायची'' 'तीन दगडाची चूल' या आत्मकथनामधून अंधश्रद्धा बाळगणारे कित्येक व्यक्ती लेखिकेने चित्रित केले आहेत. त्यात लेखिकेची आई रुक्मिण आघाडीवर आहे. भटकंती करताना एखादी व्यक्ती बिराडांसोबत आजारी पडली तर औषधोपचार न करता अंगारे-धुपारे करायचे, खुळचट कल्पनेच्या आहारी जायचे. लोकांच्या शेतातील कांदा उपटून आणला तर त्याबद्दल मार खायचा. अशी ही सगळी माणसे शब्दबद्ध करण्याचे काम विमल मोरे यांनी केले आहे. ह्या अंधश्रद्धा पूर्वजांकडून नकळत अंगामध्ये भिनतात. धूणे धुताना बोटाला काही लागले तर पाचही बोटे तोंडात घालून जेवण केले पाहिजे अशी या समाजात रीत आहे. भटकंतीत अनेक नवस-सायास, जत्रा करणाऱ्या या स्त्रीया शेंदर लावलेल्या दगड दिसला की माथा टेकवणाऱ्या आहेत. उघड्यावर देव दिसला की त्याला फिरस्ती आई म्हणून हात जोडायचा, नवस करायचा. दुकले खुपले की कोंबडे देवाला बळी द्यायचा, मरगम्मा देवीला वर्षातून एकदा न विसरता जायचे. बकऱ्यांच्या ताज्या रक्तात मुलांना खेळवायचे. तीन बोकडं आणि तीन कोंबडे कापायचे नाही म्हणून अपशकुनाला शकून करण्यासाठी चौथा कोंबडा कापायचा. अषाढाला एकत्र येऊन जमाविलेली

मिळकत उडवायची, बाळंतीण झाली तर आंघोळीचे पाणी ओलांडायचे नाही. पाणी ओलांडले तर बाळाच्या पोटात दुखते अशी जमातीत समज आहे. आंबुक्काला मुलगा होता. पाच दिवस तिला बगरमिठाच्या कन्या खायला देतात. त्यानंतर सटवाईची पूजा केली जाते. या पूजेविषयी लेखिका म्हणते-" पाचव्या दिवशी सुपात मूल ठेवून सटवाई पूजतात. बारीक पाच खडे धुऊन ओढ्याच्या कडेला ठेवतात. त्यावर हाळद वाहतात. त्या दिवशी रात्रभर ते मूल सुपातच झोपवतात कारण रात्री सटवाई येऊन त्याच्या कपाळावर त्याचे नशीब लिहिते अशी समजूत होती ."

असे या जमातीत माणूस वारला की, तो भूताखेताने किंवा देवाने धरल्यामुळे गेला अशी समजूत आहे. लेखिकेची आजी म्हसोबा काढला असता तर म्हातारा वाचला असता असे म्हणते, गौजराकाकी दोन वेळा बाळंतीण होऊन गुणसूत्राच्या अभावामुळे वेडे वाकडे मूल जन्माला येते पण अज्ञानाच्या गर्तेत सापडलेली ही जमात गोजराच्या पोटी भूत जन्मले असे म्हणतात. मूल जन्माला येणे म्हणजे देवाचे करायचे आपल्याकडून राहून गेले आहे. मुले मोठी होईपर्यंत सटवाईचे जावळ काढले नाहीत, तिला सोन्याचे जावळ वाहिले नाहीत म्हणूनच गोजराकाकीचे मुले वाचत नाहीत असे समजतात. लेखिकेच्या डोक्यामध्ये जखमा झालेल्या असतात तेव्हा आई रुक्मीन तिला सटवाईला घेऊन जाते. लेखिकेला देवीनेच धरले असा तिच्या आईचा दृढ विश्वास असतो. स्त्री -पुरुष वारला की घरात जागा सारवायची, तेथे तेलाचा दिवा लावून त्यावर टोपले झाकायचे अन् विधीवरून आल्यानंतर ओल्या जाग्यावर पक्ष्याचे किंवा प्राण्याचे पाय शोधायचे . नकळत जे दिसेल त्यावर त्याचा दुसरा जन्म शोधणारी माणसे या आत्मकथनात पाहावयास मिळतात. आजच्या आधुनिक युगात पारंपरिक व्यवसाय बदलत गेले. कुणाचीही एकाच व्यवसायावर असलेली मक्तेदारी संपुष्टात आली. पालांवरील स्त्रियांची होणारी ओढाताण, त्यांचे ताण-तणाव आणि बदललेल्या परिस्थितीमुळे भटक्या जमाती जगण्यासाठी कसा नवा मार्ग शोधतात याचे चित्रणही लेखिकेने केले आहे. जगण्यासाठी या स्त्रीने केलेला संघर्ष मन पिळवटून टाकतो. लेखिकेची आई भटकंती करीत पालावरचे जीवन जगते. घर नसलेल्या पालाला घर समजून त्यात बरकत यावी म्हणून ती नवस-सायास करते. शिक्षण म्हणजे काय हे न कळणारी आई लेखिकेच्या लग्नासाठी अहोरात्र कष्टते. लहानग्या ' इमीला ' घेऊन ती रात्री-बेरात्री पालावर जाते. अशी जीवनाची कुतरओढ करूनही स्त्री आपल्या मुलाबाळांना जपते. उघड्या-नागड्या पालासारखेच तिचेही जीवन आहे. जर्मनच्या भांड्यात पाणी तापवायचं, पालासमोर दगड ठेवून त्यावर आंघोळ करायची. मुलीला सासरला जाच होऊ नये म्हणून तिच्या भाव-भावनांना दाबून ठेवायचे. अन्याय, अत्याचाराला सामोरे जात कधी अर्धपोटी तर कधी उपाशी झोपायचे. घरात काही नसले तर चार पालं हिंडून कणी कोंडा जमवायचा. पुरुषांना कशीबशी भाकरी

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 5.35 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XVIII, Vol. II, July 2018 To Dec. 2018 

देऊन स्त्रीने मात्र पाणी पिऊनच कोरडा ढेकर द्यायचा. बाजारातील जुने कपडे लेकराचे अंग झ ाकायला आणायचे. पुरुषांची भांडणे झाली तर ती लाथा-बुक्क्या खाऊन सोडवायची. पुन्हा आषाढाला एकत्र येऊन वर्षभर मिळविलेले गमवायचे. भांड्याची बुटी डोक्यावर घेऊन जगण्यासाठी गावागावात विकायला फिरणारी ही स्त्री काबाड कष्ट उपसणारी आहे. माफक किंमतीला भांडी विकून आलेल्या पैशावर गुजरान करायची. घासाघिस करून नव्या भांड्याच्या मोबदल्यात जुन्या भांड्याची मोड घ्यायची. कधी जुने कपडे, कधी शिळे अन्न मागून खायचे. आंबुअक्का ही असाच व्यवसाय करून जगणारी स्त्री दुसऱ्या गावाला भांडे विकायला गेल्यानंतर रात्र झाली तरी ती पालावर परत येत नाही. बस चुकल्यामुळे तिला यायला उशीर होतो. शेवटी ती पालावर येते तेव्हा तिचा पती सिद्राम तिला फोकाने लाथा-बुक्क्याने झोडपून काढतो. नंतर थोडावेळ शांत राहून तो उलथणे तापवून अंबूआक्काच्या हातातून आरपार घुसवितो. अंबूआक्का विव्हळते. ती लेखिकेच्या आईला म्हणते-''थोरल्या आय... हात दुकतुया आन् मामा सांगून गेलाय भांडी इकाया जा... म्या भांडयाची बुट्टी कशी धरणार ?... आन पुरीला कशी घेणार ? त्वाच सांग! न्हाय गेली तर मरुस्तोर मारील... वैताग आलाया या जगण्याचा...गुराढोरासारखं मार खाऊन जगण्यापरीस मेल्यालं बरं ''

हाताला जखम झालेली असतानाही एक लहान मूल कडेवर घेऊन ती भांड्याचे टोपले डोक्यावर घेते आणि विकायला जाते. हा जाच सहन करण्यापेक्षा तिला मरण अधिक प्यारे वाटू लागते. भांड्याचे दुकान दिसले की, तेथून गप्पगुमान पुढे निघून जाणारी ही स्त्री पुन्हा गावभर ओरडून भांडे विकते. गोंधळी जमातीत बालविवाहाची पध्दती रूढ असलेली दिसते. मुलींना नुकतेच कळू लागले म्हणजे ती सात-आठ वर्षाची झाली की, तिच्या लग्नाची घाई सुरू होते. या विषयांचे लेखिकेचे स्वत:चे अनुभव अत्यंत प्रांजळपणे या आत्मकथनात आले आहेत. देव हा आंबुआक्काचा भाऊ विधूर असतो. त्याचे पहिले लग्न होऊन काडीमोड होते. त्याचा विवाह नववर्षाच्या मुलीशी होतो. दारूड्या बापाने लग्नाचे वय झालेल्या सुखदेवला ही मुलगी दिलेली असते. अशी ही लहानगी पोर पतीने पालात अंगाला स्पर्श केला म्हणून घाबरून बाहेर पळते. लेखिकेने अत्यंत प्रांजळतेने तिला पहिल्यांदा मासिक पाळी आल्यानंतर कसे वर्तन केले हे नमूद केले आहे. नैसर्गिक रित्या मासिक पाळी प्राप्त झालेल्या मुलीचे कसे विधी केले जातात याचे चित्रण वाचले की, या जमातीतील स्त्रियांचा अज्ञानपणा अगदी सहज कळतो. या अज्ञानपणातही कधी-कधी त्यांच्या वागण्याचा कळस होतो. लेखिका दीराला बोलते म्हणून लोक नावे ठेवतात. लिंगाप्पाची पत्नी शोभा ही लहाण्या दीराला आणि नंदांना सामावून घेत नाही. मात्र अशोकची पत्नी सुमिती ही शिकलेली असल्यामुळे सर्व घर सांभाळून नेते. लेखिका विमल मोरे यांच्यानंतर वाचकाच्या मनात घर करून राहणारी व्यक्तिरेखा

म्हणजे सुमिती. पतीच्या गोताला सांभाळून घेणारी सुमिती लेखिकेच्या शिक्षणाची खरीखुरी प्रेरणा आहे. एका पायाने अपंग असूनही काबाडकष्ट करते. सर्वांना सांबाळून घेते. आई रुक्मिण, काकू गोजरा, आजी यशोदा, आंबूआक्का या सर्व स्त्रियांच्या दुःखाचे चित्रण लेखिकेने वास्तव पातळीवरून केलेले आहे. जीवन जगण्यासाठी कुठलेही स्थिर साधने नसलेली ही माणसे अज्ञानाच्या खाईत बुडाली आहेत. गावातील अवमान सहन करून ही माणसे रात्री-बेरात्री एका गावावरून दुसऱ्या गावी जातात. लेखिकेची भटकंती सुरूच असते. लेखिका पुण्याला आपल्या चुलत बहिणीकडे शिलाई मशिनचे काम शिकण्यासाठी जाते. तेथे असताना तिचे वडील वारतात. वडिलाच्या पाचव्या दिवशी गबाळकार दादासाहेब मोरे बघायला येतात. लेखिकेसोबत त्यांचा साखरपुडा होतो. तेथे झोपण्यासाठी जागा सुद्धा नसते. लेखिका म्हणते -''सगळे पाहुणे रात्री आमच्या इथेच राहिले. झोपायला जागा पुरत नव्हती. म्हणून त्यांना समोरच्या पाण्याच्या टाकीसमोर झोपायला सांगितलं. वहिनी म्हणत होती एवढा मोठा लेखक त्याला उकिरड्यावर झोपायची वेळ आली'' यातून दादासाहेबांचा मोठेपणा सिद्ध होतो. दादासाहेबांमुळेच लेखिका पुढील आयुष्याची वाटचाल करते आणि चळवळीत काम करून आपले अस्तित्त्व सिद्ध करू पाहते.

दारिद्र्य आणि गरिबीच्या जीवघेण्या वेदनांत जीवन जगण्याचे या माणसांना काहीच वाटत नाही. त्यांचे सबंध जीवनच या दारिद्र्यामध्ये गेलेले होते. आज इथं तर उद्या तिथं अशी भटकंती चालूच होती. गावातील लोकांनी केलेला अन्याय-अत्याचार अगदी कोणालाही तक्रार न करता सहन करणे व आलेल्या प्रसंगाला तोंड देत राहणे एवढेच त्यांना माहीत आहे. हे दारिद्र्य या माणसांना कमालीच्या अवहेलना सहन करायला लावते. याच गरिबीमध्ये सतत भटकंती करायला लावून अनेक तरण्या-ताठ्या माणसांना आपला जीव गमवावा लागतो. याविषयी मेधा लिमये म्हणतात- ''गरिबी, अशिक्षितपणा यामुळे किती बालजीव हकनाक मरतात, किती स्त्रियांना शारीरिक मानसिक वेदना सहन कराव्या लागतात, हे वाचून कोणाही सहृदय व्यक्तीचं मन बेचैन होईल.'' असे बेचैन करणारे अनुभव अगदी सहजपणे वाचकाच्या मनाला भिडतात आणि अज्ञान, गरिबीच्या विळख्यात भरडली गेलेली जमात किती यातनामय जगते आहे याचा प्रत्यय वाचकाला येऊ लागतो. रोजी-रोटीसाठी पडेल तो व्यवसाय या लोकांना करावा लागतो. भांडे विकण्याचा व्यवसाय करून ती आपली उपजीविका करतात. गोपाळ शिंदे हा असाच व्यवसाय करून दारोदार फिरून जीवन जगणारा या जमातीतला एक पुरुष गोपाळ शिंदेनी भांडी विकून त्याच्या बदल्यात एक जुना शालू आणला होता. ज्या घरातून तो शालू आणतो त्या घरातील स्त्रीकडे देण्यासाठी पैसे नसतात. कारण तिचा पती दारूच्या आहारी गेलेला असतो. पत्नीने शालू विकलेला कळताच तो तिला मारू लागतो. तेव्हा ती

पालावरील भांडेवाल्याचे नाव सांगते. पोलीस पालावर येऊन गोपाळला आणि सर्व गोंधळ्यांना मारतात. गोपाळ कळवळून पोलिसांना म्हणतो- ''म्या काय बी किलू न्हाय... माज्या कडनं लय भांडी धिवून या मावशीनं ह्यो शालू दिलाया.... म्या काय चुरी केली न्हाय....'' तो पोलीस त्याचं काही ऐकून न घेता हातातल्या दांडक्यानं फटाफट मारत होता. सोडवायला जाणाऱ्यालाही मार बसत होता. गोपाळ मामाची बायको, मुलं, ठोऽऽठोऽऽ बोंबलत होती.''

असा पोलिसांचा जाच सहन करून ही माणसं जगतात. गुन्ह्याची चौकशी न करता न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा भोगावी लागते. भीतीपोटी पालावरील सर्वच माणसे पोलिसांच्या पाया पडू लागतात. गया-वया करूनही धमकी देतात. हा प्रसंग पाहिला की, या अन्याय-अत्याचाराबद्दल वाचकालाही चीड येऊ लागते. लेखिकेचे लग्न झाल्यानंतर पती दादासाहेब आणि लेखिका भटक्या-विमुक्तांच्या उद्धारासाठी कार्य करू लागतात. खेड्या-पाड्यात प्रबोधनपर सभांचे आयोजन करतात. स्वत:च्या संसाराकडे दुर्लक्ष करून हे नवीन दांपत्य त्यांच्या जीवनात उदयाची उज्ज्वल पहाट निर्माण करू पाहतात. याची प्रेरणा आपणास पतीकडूनच मिळाली याची प्रांजळ कबुली लेखिका देते. घरी आलेल्या कार्यकर्त्यांना मनमोकळेपणे बोलण्याची मुभा दादासाहेब लेखिकेला देतात. परंतु या जमातीमध्ये दिराचेही नाव घेण्याची पध्दत नसते. परपुरूषाशी बोलले तर ही माणसे संशय घेतात. लेखिकेवरही दिरासोबत बोलण्याचा आळ येतो. तेव्हा दादासाहेब त्यांच्या खुळचट समजुतीविषयी लेखिकेची समजूत घालतात. आपल्या पतीच्या उदारपणाचे चित्रण करताना लेखिका म्हणते -'' मी त्यांच्या तोंडाकडं बघू लागले. कारण आमच्या जमातीत दुसऱ्या पुरुषांशी बोलल्यावर संशय घेऊन माणसं बायकांना मारतात. डोकीवरचा पदर खाली पडू देत नाहीत आणि मोरे मला सांगत होते की, घरी असो किंवा नसो ; तू येणाऱ्या कार्यकर्त्यांशी मिळून-मिसळून वागत जा. त्यांच्या अडचणी समजावून घे आलेल्यांना चहा-पाणी विचार, मनमोकळेपणानं गप्पा मार.''

पतीच्या अशा वागण्याचे लेखिकेला कौतुक वाटते. यावरून पतीचा आपल्या स्व-जातीकडे आणि एकूणच भटक्या-विमुक्त जमातींकडे पाहण्याचा दृष्टिकोन लेखिका स्पष्ट करू पाहते. भयाण जीवन पदरी आले तरी ही माणसे कसलीही तक्रार न करता हा नशिबाचा भोग म्हणून भोगत राहतात. हे सर्व जीवन लेखिकेने स्वत: भोगले आहे, पाहिले आहे, अनुभवले आहे. लेखिकेची या जगण्यातून सुटका झाली खरी मात्र विवाहानंतरही तिची चळवळीच्या निमित्ताने पतीसोबत भटकंती सुरूच राहिली. अशा या अडचणीविषयी लेखिका म्हणते - ''आज असंख्य अडचणींना तोंड द्यावं लागत आहे. प्रत्येक दिवस नवीन समस्या घेऊन आमच्यासमोर उभा राहतोय. परंतु त्या समस्येला आणि जीवनात येणाऱ्या ज्ञात-अज्ञात प्रश्नांना तोंड देण्याची जिद्द माझ्यात निर्माण झाली आहे. माझ

यातला आत्मविश्वास मला परिस्थितीशी संघर्ष करण्याची उर्मी देतो आहे. त्यामुळंच तर जगण्याचा प्रश्न मला कधी भेडसावत नाही; कारण नवसमाज निर्मितीचं ध्येय आम्ही समोर ठेवलं आहे.'' अशी नवसमाज निर्मितीच्या ध्येयाने प्रेरित झालेली लेखिका तिच्या समोरच्या अडचणींना तोंड देण्यासाठी सिद्ध झाली आहे. आलेली संकटे तिचा आत्मविश्वास प्रबळ करीत आहे. अनेक खाच-खळग्यांच्या वाटा तुडवित लेखिका पहाटेचा सूर्य शोधण्यासाठी भटकते.

**निष्कर्ष :**

१. विमल मोरे यांनी जमातीला, जमातीच्या पंरपरेला जात पंचायतीच्या शिक्षेला न जूमानता भटक्या स्त्रीचे दु:ख अत्यंत ताकदीने या आत्मकथनातून उभे केले आहे.

२. अज्ञान, परंपरा आणि रुढी प्रथेच्या चक्रात गुरुटलेल्या गोंधळी जमातीत जन्मलेल्या मुलीला आत्मभान प्राप्त होई पर्यंतचा प्रवास या येथे शब्दबद्ध झाला आहे.

३. भटक्या स्त्रिचे जगणे कसे कष्टप्रत आणि कमालीचे अवमानकारक असते याचे जिवंत चित्रण या आत्मकथनातून झाले आहे.

४. भटक्या स्त्रिच्या जीवनामध्ये प्रकाश निर्माण करण्यासाठी लेखिका आयुष्यभर धडपडताना दिसते, नव्हे ती भटक्या-विमुक्त स्त्रियांचे प्रतिनिधीत्व करते.

५. नवसमाज निर्मितीच्या ध्येयाने प्रेरित झालेली लेखिका त्यांच्या समोर येणाऱ्या असंख्य अडचणींना तोंड देण्यासाठी सिद्ध होते, हेच या आत्मकथनाचे सामर्थ्य आहे.

## संदर्भ सूची :-

१. विमल दादासाहेब मोरे, 'तीन दगडाची चूल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-२०००

२. डॉ. लीनकुमार बावणे,'भटक्यांचा भग्नसंसार आणि संस्कृती', सुधीर प्रकाशन, वर्धा-२००५

३. डॉ. मेधा लिमये, दै. केसरी, दि. २२ जुलै २००१